वाचले :- १) आदेश क्रमांक लेखा/३/कावि/१३३/२०२० दिनांक १८/५/२०२०

२) आदेश क्रमांक लेखा/१अ/कावि/४०८/२०१४ दिनांक २६/६/२०१४

३) महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक वाहभ-२०२०/प्र.क्र.०३/२०२०/सेवा/-५ दिनांक २० एप्रिल २०२२

४) कर्मचारी महासंघाचे दिनांक २०/४/२०२२ चे पत्र

५) मा.आयुक्त यांचे कडील दिनांक२२ / ४ / २०२२ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८. लेखा विभाग
क्र. लेखा/१अ/कावि/४२०/२०२२
दिनांक :- २२ / ४ /२०२२

**विषय :- सुधारित दराने वाहतूक भत्ता मंजुरीबाबत ...**

आदेश,

सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक वाहभ - २०२०/प्र.क्र.०३/२०२०/सेवा-५ दिनांक २० एप्रिल २०२२ नुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना दिनांक १ एप्रिल २०२२ पासून वाहतूक भत्त्याचे दरामध्ये खालील प्रमाणे सुधारणा केली आहे.

| अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन स्तर (Pay Level) मधील वेतन | वाहतूक भत्त्याचा दर (रू.) | |
|---|---|---|
| | बृहन्मुंबई नागरी समुह, नागपूर नागरी समूह व पुणे नागरी समूह | इतर ठिकाणे |
| एस-२० व त्यावरील | रू.५४००/- | रू.२७००/- |
| एस-७ ते एस-१९ | रू.२७००/- | रू.१३५०/- |
| एस-१ ते एस-६ | रू.१०००/- | रू.६७५/- |

उपरोक्त एस-१ ते एस-६ या वेतन स्तर मधील रू.२४२००/-व त्यापेक्षा जास्त वेतन आहरित करणा-या बृहन्मुंबई नागरी समुह ,नागपुर नागरी समूह व पुणे नागरी समुह मधील कार्यरत कर्मचा-यांना रू.२७००/- व इतर ठिकाणी कार्यरत कर्मचा-यांना रू.१३५० इतका वाहतूक भत्ता अनुज्ञेय राहील.

उक्त शासन निर्णयानुसार अंध, अस्थिव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पीडीत असणा-या तसेच मुकबधीर / श्रवणशक्तीतील दोष असणा-या राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा–यांना सध्या अनुज्ञेय असणा-या वाहतूक भत्त्यामध्ये पुढीलप्रमाणे वाढ करण्यात आली आहे.

| अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन स्तर (Pay Level )मधील वेतन | वाहतूक भत्त्याचा दर (रू.) | |
|---|---|---|
| | बृहन्मुंबई नागरी समुह, नागपूर नागरी समूह व पुणे नागरी समूह | इतर ठिकाणे |
| एस-२० व त्यावरील | रू.१०८००/- | रू.५४००/- |
| एस-७ ते एस-१९ | रू.५४००/- | रू.२७००/- |
| एस-१ ते एस-६ | रू.२२५०/- | रू.२२५०/- |

अंध,अस्थिव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पीडीत असणा-या तसेच मुकबधीर / श्रवण शक्तीतील दोष असणा-या उपरोक्त एस-१ते एस-६ या वेतन स्तर मधील रू.२४२००/-व त्यापेक्षा जास्त वेतन आहरित करणा-या बृहन्मुंबई नागरी समुह, नागपूर नागरी समूह व पुणे नागरी समुह मधील कार्यरत कर्मचा-यांना रू.५४००/- व इतर ठिकाणी कार्यरत कर्मचा-यांना रू.२७००/- इतका वाहतूक भत्ता अनुज्ञेय राहील.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा समावेश पुणे नागरी समुहामध्ये होत आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगर पालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे वेतनस्तर मधील वेतन विचारात घेऊन उपरोक्त क्रमांक ३ चे शासन निर्णयात पुणे नागरी समुहाकरिता नमुद केले प्रमाणे सुधारित वाहतूक भत्ता दिनांक १/४/२०२२ पासून खालील अटी व शर्तीचे अधिन मंजुर करण्यात येत आहे.

एक) कर्तव्य स्थानापासुन एक किलोमीटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यंस्थान आणि निवासस्थान यांच्या एकत्र परिसरात शासकीय निवासस्थान पुरविण्यात आलेल्या कर्मचा-यांना हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

दोन) ज्या कर्मचा-यांना शासकीय वाहतूक सुविधा पुरविण्यात आली आहे. त्यांना हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

तसेच वाहतूक भत्त्यांचे प्रदान करण्यासंदर्भात इतर विदयमान तरतुदी व कार्यपध्दती आहे त्याच प्रकारे यापुढे लागू राहील.

तीन) रजा, प्रशिक्षण,दौरा,इत्यादी कारणांमुळे संपूर्ण कॅलेंडर महिन्यात अनुपस्थित असल्यास त्या महिन्यात हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

सुधारित दराने वाहतूक भत्ता माहे एप्रिल २०२२ चे वेतनात अदा करण्यात यावा.

२१/०४/२२

(राजेश पाटील )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रति,

सर्व संबंधित विभाग प्रमुख / शाखाप्रमुख

प्रत :-

१) प्रशासन विभाग
२) मा. मुख्य माहीती व तंत्रज्ञान विभाग
२/सुधारित दराने वाहतूक भत्त्याचा बदल संगणक प्रणालीमध्ये करण्यात यावा.

(जितेंद्र कोळंबे )
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८